# आश्चर्यकारक फ्लेक्सागॉन

फ्लेक्सागॉन हे एक फिरवता येण्याजोगे कागदाच्या घड्या घालून बनवण्याचे खेळणे आहे. त्याला वेगळ्या तऱ्हेने फिरवले, की निराळेच चित्र समोर येते. एखाद्या गोष्टीचे चार टप्पे किंवा एखादी मालिका दाखवण्यासाठी त्याचा उपयोग करता येतो. अजिबात न फाटता कागद इतक्या प्रकारांनी फिरवता येतो हे खरोखरच आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय आहे.



1. 20 सेंमी. x 10 सेंमी. आकाराचा झेरॉक्ससाठी वापरतात तसा कागद घ्या. त्यात दोन चौरस असतील.



2. लांबीच्या बाजूने कागदाच्या मध्याशी भिडतील अशा दोन घड्या घाला.



3. रुंदीच्या बाजूने आठ सारख्या अंतराच्या घड्या घाला.



4. पट्टी आणि पेन्सिल घेऊन चित्रात दाखवल्याप्रमाणे दहा तिरक्या रेषा मारा.



5. रंगवलेले 2 भाग डाव्या हाताच्या फटीत अडकवा म्हणजे ते घट्ट बसतील आणि लोलक तयार होईल.



6. वरच्या आणि खालच्या बाजूच्या त्रिकोणी घड्या आतल्या बाजूला दुमडा.



7. या बाजू आत दुमडल्या की फ्लेक्सागॉन झाला तयार.



8. हा आकार आता दोन्ही हातात धरा आणि गोल फिरवा. लवकरच चार निरनिराळ्या बाजू दिसू लागतील. याचा वापर करून अन्नाची साखळी, निरनिराळे ऋतू किंवा फुलपाखराच्या प्रगतीचे टप्पे, अशा अनेक गोष्टी तुम्हाला दाखवता येतील.